४ फेब्रुवारी २०१४ सकाळ : पुणे




गणेश कला-क्रीडा मंच : माईर्स-एमआयटी शिक्षण संस्थेच्या 'भारत अस्मिता' पुरस्कार सोहळ्यात (डावीकडून) डॉ. वासुदेव गाडे, डॉ. विजय भटकर, डॉ. विश्वनाथ कराड, डॉ. रघुनाथ माशेलकर, डी. आर. मेहता, अर्णब गोस्वामी, कलिकेश नारायणसिंग देव, प्रा. एम, एस. पिल्लाई, प्रा. राहुल कराड, चंचला कोद्रे व प्रा. डी. पी. आपटे.

# अपंगत्वमुक्तीचा आनंद अलौकिक

## डी. आर. मेहता यांची भावना; 'भारत अस्मिता'चे वितरण

**पुणे, ता. ३ :** "विज्ञान आणि सेवाभाव या दोन्हींना एकत्र आणत मी 'जयपूर फूट'चे स्वप्न प्रत्यक्षात उतरविले. एखादा अपंग माणूस उदास चेहऱ्याने आमच्या संस्थेत दाखल होतो. त्याला कृत्रिम पाय बसविल्यावर त्याच्या चेहऱ्यावर झळकणारा अलौकिक आनंद मला आयुष्याचे प्रयोजन सांगून जातो," अशी भावना जयपूर फूट प्रकल्पाची मातृसंस्था असणाऱ्या 'भगवान महावीर विकलांग सहायता समिती'चे संचालक डी. आर. मेहता यांनी व्यक्त केली.

माईर्स एमआयटी शिक्षण संस्थेच्या दहाव्या 'भारत अस्मिता' राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात संशोधक डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते मेहता यांना 'विज्ञान-तंत्रज्ञान श्रेष्ठ' पुरस्काराने गौरविण्यात आले. महापौर चंचला कोद्रे, कुलगुरू वासुदेव गाडे, संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, प्रा. राहुल कराड व मंगेश कराड उपस्थित होते. 'साधना सेंटर फॉर मॅनेजमेंट अँड लीडरशिप डेव्हलपमेंट'चे संस्थापक प्रा. एम. एस. पिल्लई, 'टाइम्स नाऊ'चे संपादक अर्णब गोस्वामी आणि खासदार कलिकेश नारायणसिंग देव यांनाही पुरस्कार देण्यात आला. मेहता म्हणाले, "संस्थेने एखाद्याला बसवून दिलेल्या कृत्रिम अवयवाची किंमत करताही येईल. पण, निर्मळ सेवेचा मला मिळणारा आनंद मात्र अमूल्य असतो." गोस्वामी यांनी माध्यमांची प्रगती पाहता येत्या काळात भारतात जागतिक पातळीवरची वृत्तवाहिनी सुरू होईल, असे संकेत दिले.